# स्त्रीवाद

## (स्वरुप आणि प्रासंगिकता)




संपादक

**डॉ. संदीप बी. काळे**

**स्त्रीवाद** ( स्वरुप आणि प्रासंगिकता )

■ डॉ. संदीप बी. काळे

■ प्रथम आवृत्ती – दि. ०८ मार्च २०२२

© प्रकाशक व संपादक

■ प्रकाशक

आधार पब्लिकेशन, अमरावती.
हनुमान मंदिराजवळ, पाठ्यपुस्तक मंडळा समोर,
वि.म.वि.कॉलेज मागे, अमरावती
मो. ९५९५५६०२७८
email- aadharpublication@gmail.com

■ मुखपृष्ठ संकल्पना

विलास पवार

सरिता ग्राफिक्स, अमरावती

■ अक्षरजुळवणी

सरिता ग्राफिक्स,
कठोरा रोड, अमरावती

■ Price : 400/-

**ISBN-** 978-93-91305-97-0

**सुचना:-** सदर अंकामध्ये प्रकाशित झालेल्या लेखास, संपादक, प्रकाशक, मालक, मुद्रक जबाबदार राहणार नाही. या अंकामध्ये प्रकाशित झालेले लेख लेखकाचे त्यांचे वैयक्तिक मत आहे.

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | लेख | लेखक | पु.क्र. |
|---|---|---|---|
| 1 | मराठी स्त्रीवादी साहित्य | प्रा.पद्मा प्रवीण हुर्शिंग | 1 |
| 2 | मामा वरेरकरांच्या 'विधवाकुमारी' व 'धावता धोटा' कांदबरीतील स्त्रीमुक्ती विचार | प्रा.डॉ.विवेक गं.देशमुख | 8 |
| 3 | मराठी स्त्रिवादी साहित्य | पल्लवी श्रिकांत गायकवाड | 14 |
| 4 | मराठी स्त्रीवादी साहित्य | श्री दगडूबा कोंडीबा माघाडे | 22 |
| 5 | स्त्रियांना आत्मभान देणारी कविता कन्या रास | शरद ठाकर | 28 |
| 6 | मराठी स्त्रीवादी साहित्य | डॉ. स्नेहल संजय मराठे | 35 |
| 7 | स्त्रीवाद आणि महिला सबलीकरण | प्रा.डॉ. संजय सु. आहिरे | 44 |
| 8 | स्त्रीवादाचे मुख्य प्रवाह | डॉ . संगीता. एस. भुयार | 54 |
| 9 | स्त्रीवादी चित्रपट सिध्दांत | सुमती हेमंत टापसे | 57 |
| 10 | रिटा वेलिणकर -शांत गोखले(उपयोजित समीक्षेच्या अंगाने अभ्यास) | प्रा. डॉ .मीनाक्षी पुंडलिक पाटील | 62 |
| 11 | अजून स्त्री व्यक्ती का नाही | डॉ. प्रांजू आर. हिरेखन | 75 |
| 12 | स्त्रीवाद आणी महिला सशक्तिकरण | डॉ. सोमा पी. गोंडाणे | 85 |
| 13 | स्त्रीवादी आणि स्त्री मानसिकतेचा विचार | डॉ. वीणा नारायणे | 92 |
| 14 | कविवर्य ग्रेस ह्यांच्या कवितेतील गूढ अगम्य स्त्री संदर्भ : महानायिका आणि संसार नायिका | किरण शिवहर डोंगरदिवे | 98 |

# मराठी स्त्रीवादी साहित्य

डॉ. स्नेहल संजय मराठे
मराठी विभाग,म.स.गा. महाविद्यालय मालेगाव कॅम्प, मालेगाव जि. नाशिक

**प्रस्तावना :** स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जीवनाच्या शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक, वैज्ञानिक सर्वच क्षेत्रात अर्थपूर्ण प्रगती झाली. त्याचा फायदा स्त्रीला मिळाला. भारतीय राज्य घटनेने स्त्रियांना समानता दिली. १९५५ साली पास झालेल्या हिंदू कोड बिलाने स्त्रियांना विविध महत्त्वाच्या कायद्यांचा आधारही प्राप्त करून दिला. स्त्रीने जीवनाच्या विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचे पंख पसरले. किंबहुना असे एकही क्षेत्र आज सांगता येणार नाही की जिथे स्त्रीने पदार्पण केले नाही. शिक्षण, संशोधन, ललितकला, वैद्यक, स्थापत्य, कृषी, विज्ञान, राजकारण, समाजकारण अशा सर्वच क्षेत्रात स्त्रीच्या कर्तुत्वाची आज नाममुद्रा उमटली आहे. त्याचे चित्र थोड्याफार प्रमाणात साहित्यात उमटले.

१९७५ हे वर्ष संयुक्त राष्ट्रसंघाने 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' म्हणून घोषित केले. जागतिक पातळीवर स्त्री चळवळीला सुरुवात झाली. या पार्श्वभूमीवर स्त्री प्रश्नांच्या संदर्भात विचार करणारे, नवीन ध्येय- उद्दिष्टांना प्रेरित करणारी स्त्री लेखिकांचे स्त्रीवादी साहित्य आले. स्त्रीजीवन, स्त्रियांचे विविध प्रश्न, स्त्रियांचा सामाजिक दर्जा, स्त्रियांकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन या सर्वच बाजूंनी स्त्रीलेखिकांच्या साहित्यात नव्याने विचार सुरू झाले. १९७५ - १९८५ या आंतरराष्ट्रीय 'स्त्री दशकात' स्त्रीवादी विचारांना बळकटी देऊन विविध संदर्भ प्राप्त झाले. याचा परिणाम असा झाला की स्त्रीवादी वैचारिक लेखन विस्तारत गेले.

**मराठीतील संत स्त्रियांचे लेखन :**

महाराष्ट्रातील भक्ती परंपरा ज्ञानदेव - नामदेव, मुक्ताबाई- जनाबाई या पिढीपासून सुरू होऊन तुकाराम आणि बहिणाबाई यांच्या पिढीपर्यंत कळसापाशी पोहोचते. जवळपास पाचशे वर्षांचा हा काळ वारकरी संप्रदायाच्या प्रसार आणि प्रभावाने भारलेला आहे. सर्व जातींना दार खुले असणाऱ्या या परंपरेत अस्पृश्यांना

आणि स्त्रियांना सहभागी करून घेतले होते. या परंपरेने जनसामान्यांची भाषा व्यवहारात वापरण्याचा कटाक्षाने आग्रह धरला. वारकरी संतांनी ओवी, अभंग, भारुड, विरहिणी, पाळणा अशा भिन्न छंदामध्ये लिहिले. हे सर्व छंद सर्वसामान्य स्त्री-पुरुषांच्या दैनंदिन जीवनाच्या लयीतून साकारले होते. ओवीचे मूळ स्त्रियांच्या जात्यावरील श्रमापाशी आहे. जनाबाई, सोयराबाई, बहिणाबाई यांनी आपली रचना अभंगात रचली. जनाबाईच्या दळणकांडणाच्या रोजच्या जगण्यात विठोबा कष्टांचा भार हलका करतो. समाजातील जातिभेद, लिंगभेद यावर संत स्त्रियांचे लेखन त्याकाळी दुर्लक्षिले गेले. खरे तर वारकरी संप्रदायामध्ये ज्या स्त्रिया वारकरी होऊन समान पायावर सामील झाल्या त्यांनी आपल्या समाजात मोठे धीराचे पाऊल उचलले होते. ज्या घरात, ज्या समाजात त्यांना दुय्यमत्त्व दिले होते, त्यातील आशय घेऊन विषमतेच्या व्यवस्थेला शह देण्यासाठी त्या निर्भीडपणे लिहित राहिल्या. महदाईसा, बाईसा, आऊसा, मुक्ताबाई, जनाबाई, सोयरा, निर्मळा, संत सखु, प्रेमाबाई, बहिणाबाई या संत स्त्रिया म्हणजे जहाल, बंडखोर आणि दमदार अभिव्यक्ती यांनी परिपूर्ण असलेल्या स्त्रिया होत. इतर संत कवींप्रमाणे या कवयित्री विरक्त वृत्तीनेच जगत होत्या. विठ्ठलभक्तीचा किंवा कृष्णभक्तीचा महिमा गातांना त्यांची ही स्त्रीच्या अनुभवाची भाषा होती. 'स्त्री जन्म म्हणूनि न व्हावे उदास' अशी त्यांची वृत्ती. म्हणून आपण स्त्री आहोत याचा त्यांना विषाद वाटत नाही. प्रपंच मागे टाकून परमार्थाच्या वाटेवर आलेल्या या स्त्रिया भक्तीत रंगल्या आहेत. कविता लेखन करणाऱ्या स्त्रियांची संख्या थोडी असली तरी त्यांची कविता 'प्रकृती'ने वेगळी आहे कारण या कवितेला 'ऐहिकाचे' भान आहे. विठ्ठलाचे वर्णन करताना जनाबाई म्हणते, 'विठु माझा लेकुरवाळा | संगे लेकुरांचा मळा ||', 'ताटीच्या अभंगा'तून मुक्ताबाईने ज्ञानेश्वरालाच समजाविले आहे की, 'संत जेणे व्हावे | जग बोलणे सोसावे ||' परमेश्वराचे चित्र या स्त्रियांनी प्रापंचिक म्हणूनच रेखाटले. त्याचे वर्णन करताना त्यांचे देहभान हरपते. वारकरी परंपरेतील बहिणाबाई (१६२८-१७००) ही शेवटची संत स्त्री. ज्या काळात बहिणाबाई जन्मली त्या काळात स्त्रियांना ज्ञान, संपत्ती अध्यात्मक अशा कोणत्याच क्षेत्रात कोणतेही हक्क नव्हते. जन्मजात ब्राह्मणी

वर्चस्वाला शह देऊन सर्व मानवतेसाठी वैश्विक सत्य सांगण्याचा बहिणाबाई प्रयत्न करतात. पुरुषसत्ताक व्यवस्थेला खिळखिळी करण्याचा प्रयत्न करते. प्रपंच आणि परमार्थ यामध्ये समतोल साधण्याचा प्रयत्न करते. ७२९ अभंगातून आत्मनिवेदन करणाऱ्या बहिणाबाईंचे योगदान महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाच्या दृष्टीने महत्वपूर्ण आहे.

**स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्रियांचे लेखन :**

एकोणिसाव्या शतकात इंग्रजांच्या राजवटीत नव्या विज्ञाननिष्ठेचा उदय झाला. नवशिक्षणाचा वारा स्त्रियांना फारसा लागलेला नव्हता. घराच्या चार भिंतीत कोंडलेल्या स्त्रीला देव-देवतांची गाणी गावीत यातच समाधान वाटत होते. पार्वताबाई गोखले यांनी संकलित केलेल्या 'स्त्री गीतरत्नाकर' (१९०३), मनुबाई भोरकर यांची 'फेराची गाणी ' (१९१२) इत्यादी कवितासंग्रह पाहिले की हे लक्षात येते, स्वतःला 'शून्य' म्हणून संबोधणाऱ्या लक्ष्मीबाईंनी शून्य मनाने जगणे पत्करले नाही. १९०३ च्या ' मनोरंजन' मासिकाच्या दिवाळी अंकात त्यांची 'करंजातल्या मोदक' ही कविता प्रसिद्ध झाली. या कालखंडात लोकप्रियता, कौतुक मिळविणारी कविता म्हणजे संजीवनी मराठे यांची कविता. काव्य संजीवनी (१९३२), रांका (१९३८), संसार (१९४३) इत्यादी त्यांचे कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत.

१९२० ते १९४५ या काळात महाराष्ट्रातील समाजजीवन झपाट्याने बदलले होते. मार्क्सवाद, फ्रॉईडचे मनोविश्लेषण, गांधीवाद, विभक्त कुटुंबपद्धती व रविकिरण मंडळ, फडके - खांडेकर युग या सर्व गोष्टी महाराष्ट्राने याच कालावधीत अनुभवल्या. याच काळाच्या शेवटी १९४० पासून मर्ढेकरांची कविता आणि गंगाधर गाडगीळांची नवकथाही आली. या नवसाहित्याने परंपरेचे, तंत्राचे रुढ साचे मोडले. पण स्त्रियांच्या कथांमध्ये या काळातील नवकथेचे प्रतिबिंब कमी प्रमाणात आहे.

१९२० पर्यंत स्त्री लेखिकांनी फारसे कादंबरी लेखन केलेले दिसून येत नाही. आपल्या स्वतंत्र अस्तित्वाची जाणीव नव्या स्त्री लेखिकांना थोड्याफार प्रमाणात झाली होती. पण आजूबाजूचे सामाजिक व कौटुंबिक वातावरण मात्र बदलत नव्हते. कमलाबाई सोहोनी, आनंदीबाई जयवंत, कुमुदिनी रांगणेकर, प्रेमा

कंटक, मालतीबाई दांडेकर, सुधा साठे, सरोजिनी बाबर, शांता शेळके इत्यादी स्त्री लेखिकांनी जे कादंबरीलेखन केले त्यामागे स्त्रीचे दुःख चित्रित करण्याचा प्रयत्न केलेला नाही. स्त्री ही एक व्यक्ती आहे, तिलाही स्वतःचे अस्तित्व आहे असा विचार या कालखंडात केलेला नाही. विभावरी शिरुरकर यांनी 'हिंदोळ्यावर' या कादंबरीच्या माध्यमातून कादंबरीला एक नवी जाणीव देण्याचा प्रयत्न केलेला आहे. गीता साने यांनी स्त्री पुरुष संबंधाचे वास्तव दर्शन घडविण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते. 'निखळलेली हिरकणी' (१९३६), 'वठलेला वृक्ष' (१९३६), 'फेरीवाला' (१९३८) असा त्यांच्या कादंबरी लेखनाचा आवाका आहे.

१८५० ते १९५० या शंभर वर्षांच्या कालखंडामध्ये स्त्रियांच्या लेखनाने नियतकालिकांच्या माध्यमातून लक्षणीय प्रगती केली. स्त्री नियतकालिकांची प्रथम वाचक होती. परंतु नंतर लेखन आणि त्यानंतर संपादक म्हणूनही स्त्रियांनी नियतकालिकांच्या क्षेत्रात कर्तुत्व निर्माण केले.

स्त्रियांना स्वतःच्या अस्तित्वाची आणि आपल्या जीवनातील आत्मशोधाची पूर्णता जाणीव झालेली नसल्याने त्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात खूप कमी आहेत प्रमाणात आत्मचरित्रे लिहिली. ही आत्मचरित्रे पति चरित्रे असून त्यात सहजीवनाच्या कथा आहेत. रमाबाई रानडे यांचे 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी', लक्ष्मीबाई टिळक यांचे 'स्मृतिचित्रे', लिलाबाई पटवर्धन यांचे 'आमची अकरा वर्षे', आनंदीबाई कर्वे यांचे 'माझे पुराण' इत्यादी आत्मचरित्राला वेगळेपण लाभले आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्री लेखिकांनी लिहिलेल्या नाटकांची संख्या खूप कमी प्रमाणात आहे. मालतीबाई बेडेकर यांनी 'पारध', इंदुमती देशमुख यांनी 'शीला', हिराबाई पेडणेकर यांनी 'दामिनी', सुधा साठे यांनी 'एकच गाठ', आनंदी किर्लोस्कर यांनी 'नव्या वाटा' इत्यादी स्त्री लेखिकांनी फक्त स्वातंत्र्यपूर्व काळात नाटक लिहिण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

शांताबाई जोशी या लेखिकेने लिहिलेली 'बिचारी आनंदीबाई' ही कथा स्त्रीने लिहिलेली पहिली कथा होय. स्वातंत्र्यपूर्व काळात अनेक स्त्री लेखिकांनी कथा

लिहिल्या आहेत. त्यातून त्यांचे मन, धार्मिक व सामाजिक जीवन आविष्कृत झालेले आहे. सौ. काशीबाई कानिटकर यांनी आपल्या 'चांदण्यातील गप्पा' (१८९८) या कथासंग्रहातून नीती व धर्मविषयक संस्कार करण्याचा प्रयत्न केलेला आहे. १९२० ते १९४० या कालखंडात नवशिक्षित जागृत स्त्री लेखिकांनी स्त्रीच्या व्यथा, तिची स्वप्ने, तिचे प्रश्न समजावून घेऊन ते आपल्या साहित्यात मांडले. विभावरी शिरूरकर, कुसुमावती देशपांडे, गीता साने, कृष्णाबाई, कमलाबाई टिळक, मालती दांडेकर इ. स्त्री लेखिकांनी स्त्रीच्या मनाची जडणघडण व तिची सुख-दुःखे यांचा वेध घेण्याचा प्रयत्न आपल्या कथांमधून केला आहे.

**स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रियांचे लेखन :-**

स्वातंत्र्यानंतरच्या काळात अनेक क्षेत्रात बदल झाले. त्याचे पडसाद साहित्यातही उमटले. या कालखंडात लेखिकांनी लिहिलेल्या समाजशास्त्रीय वैचारिक लेखनात त्यामुळेच शैक्षणिक, सामाजिक, राजकीय असे वैविध्य आढळते. स्त्रियांच्या साहित्याकडे स्त्रीवादी दृष्टिकोनातून पाहिले जाऊ लागले. स्त्रीवर परंपरेने लादून दिलेली बंधने, मालकी हक्क, सनातन रुढी इत्यादी कल्पनांना झुगारून देणं याकडे या स्त्री लेखिकांची दृष्टी वळल्याचे दिसून येते.

शिक्षणविषयक भूमिकेतून लेखिकांनी प्रामुख्याने विद्यार्थ्यांच्या विकासाचा प्रश्न विचारात घेतलेला दिसतो. त्यातून समाजाचा राज्याचा विकास असे समीकरण जाणवते. शिक्षणाचा आशय, शैक्षणिक प्रक्रिया आणि तिचा सामाजिक संबंध यांचा विचार जर योग्य प्रकारे झाला तर देशाची प्रगती शिक्षणातून निर्माण होणाऱ्या योग्य नागरिकांमुळे होऊ शकेल असा विश्वास डॉ. चित्रा नाईक यांना वाटतो. आशा परुळेकर, लीलाताई पाटील, लीलावती भागवत यांच्या लेखनात प्रामुख्याने केंद्रस्थानी विद्यार्थी - विद्यार्थ्यांचे विश्व, विद्यार्थ्यांच्या समस्या, त्यावरचे उपाय यांचाच विचार केलेला आहे. इरावती कर्वे, कमल मुळे, सुमन पाटे, इंदुमती पारीख अशा अनेक लेखिकांनी सामाजिक वैचारिक लेखन केले आहे.

अनेक लेखिकांनी राजकारणविषयक लेखन केले आहे. नलिनी पंडित यांनी **'जातिवाद आणि वर्गवाद'** या पुस्तकातून समाजाच्या विशिष्ट घडणीसंबंधी आपला

दृष्टिकोन स्वतंत्रपणे व विस्ताराने मांडला आहे. डॉ. नलिनी पंडित यांनी 'धर्मशासन आणि समाज' या ग्रंथाद्वारे शासनाने कोणते धोरण स्वीकारावे, नव्या समाजात धर्माचे स्थान कोणते असावे इत्यादी प्रश्नांवर विचारमंथन केले आहे. सुमन दाभोळकर यांनी 'समाजवाद' या पुस्तकातून समाजवादाची वाटचाल, साम्यवादाचा इतिहास यांचा आलेख रेखाटला आहे.

कथा, कविता या ललित वांग्मयाप्रमाणे कादंबरी वेगाने विकसित झाली नाही. स्त्री जीवनातील समस्यांचे चित्रण करणाऱ्या, स्त्री मनाचे दुःख प्रभावी रीतीने मांडणाऱ्या विभावरी शिरूरकर यांची 'बळी' (१९५०) ही कादंबरी प्रसिद्ध झाली आणि तिने वाचकांचे लक्ष एका वेगळ्याच अनुभव विश्वाकडे वेधून घेतले. १९६० नंतरच्या कालखंडामध्ये ज्योत्स्ना देवधर यांच्या 'घरगंगेच्या काठी' या कादंबरीत एकत्र कुटुंबातील स्त्रीची होणारी कुचंबणा आणि पुरुषी वर्चस्वाचे दर्शन घडविले आहे. शांता मिसाळ यांनी 'बेघर' (१९७६) या कादंबरीद्वारे सुशिक्षित स्त्री मनाची घुसमट वेगळ्या पद्धतीने मांडली आहे. गौरी देशपांडे यांनी आपल्या कादंबरीतील स्त्रीला प्रत्येक बाबतीत स्वातंत्र्य बहाल केलेले आहे. स्त्रीवादी भूमिकेतून त्यांनी लेखन केले आहे. सानिया, आशा बगे, कमल देसाई, प्रिया तेंडुलकर इत्यादी लेखिकांनी आजच्या आधुनिक स्त्रीचे चित्रण, तिचे बदलत चाललेले व्यक्तिमत्व, तिच्या आयुष्यातील विविध प्रश्न इत्यादी अनेक गोष्टी आपल्या कादंबरीतून प्रतिबिंबित केल्या आहेत. मालतीबाई बेडेकर यांनी लिहिलेली 'खरे मास्तर' (१९९३) ही कादंबरी म्हणजे त्यांच्या वडिलांची जीवनकथाच आहे. 'गुढयात्री' (१९९०) या विद्या सप्रे -चौधरी यांनी लिहिलेल्या कादंबरीचे स्थान वेगळेच आहे.

मुक्ताबाई दीक्षित यांचे 'जुगार' (१९५१) हे पहिले आणि लक्षणीय स्वतंत्र नाटक आहे. मालतीबाई दांडेकर यांनी 'ज्योती' (१९५५), 'जावई', 'सं. संस्कार' (१९६४), 'मावशी द ग्रेट' (१९८२) ही नाटके लिहिली. मुलींनी शिक्षण घेतले तरी जबाबदारीचे भान ठेवायला हवे, असे त्या स्पष्टपणे आपल्या नाटकांमधून मांडतात. सई परांजपे या विसाव्या शतकाच्या अखेरच्या पर्वातील महत्त्वाच्या नाटककार आहेत. 'जास्वंदी' (१९७६), 'माझा खेळ मांडू दे' (१९८६) ही त्यांची दोन्ही प्रकाशित

ाटके महत्त्वाची आहेत. मीना देशपांडे यांचे 'नलू सांगा कोणाची?' (१९९९) हे वेसाव्या शतकाअखेरीचे क्रांतिकारी आशय सांगणारे नाटक आहे. सरिता पदकी, मीना देशपांडे, ज्योती म्हापसेकर इत्यादी लेखिकांच्या नाटकांतून स्त्रीमुक्ती चळवळीच्या अनेकांगी विस्तारानंतर आलेले भान अधोरेखित होते.

१९६० नंतर मराठी कवितेत नव्या जाणिवा जन्माला आल्या. माधव ज्युलियन यांनी प्रेरित झालेल्या शांताबाई शेळके यांनी वर्षा रुपसी (१९५६), तोच चंद्रमा (१९७३), गोंदण (१९७५) हे संग्रह प्रसिद्ध केले. विशुद्ध भावकवितेचे लावण्य आढळते ते इंदिरा संत यांच्या कवितांतून ! मेंदी, मृगजळ, बाहुल्या या संग्रहातील त्यांच्या कविता त्या त्या मनोवृत्तीच्या लहरींची कविता आहे. पद्मा गोळे यांचा 'प्रीतीपथावर' (१९४७), 'नीहार' (१९५४), 'आकाशवेडी' (१९६८) तसेच शिरीष पै यांचा एकतारी (१९६५), एका पावसाळ्यात (१९६९),अंजली ठकार यांचा 'तुलसीदास' (१९७१), सुशीला पगारिया यांचा मनवृंदावन (१९७०) या कवितासंग्रहातून एक हळवे थरथरते भावविश्व व्यक्त होते आहे.

१९५० नंतर मराठीतील आत्मचरित्र लेखनाला नवी दिशा मिळाली. नृत्यकलेचा अभ्यास करणाऱ्या रोहिणी भाटे यांनी 'माझी नृत्यसाधना' (१९५०) या आत्मकथनात या कलेसाठी कशी तपश्चर्या केली ते सांगितले आहे. चित्रपट क्षेत्रांसाठी संपूर्ण आयुष्य वेचणाऱ्या जयश्री गडकर, लालन सारंग, सीमा देव, हंसा वाडकर, कांचन घाणेकर, मालती पांडे, भोळे इत्यादी स्त्री लेखिकांनी आत्मचरित्रे लिहिली आहेत. आनंदात राहून आपल्या परिसरातील सर्वांना आनंदित ठेवणाऱ्या गिरिजाबाई केळकर यांचे 'द्रौपदीची थाळी' (१९५९) तसेच उषाबाई डांगे यांचे 'पण ऐकतं कोण?' (१९६९) हे आत्मचरित्रपर लेखनाचे वेगळे रूप समोर येते. इंदिरा मायदेव यांचे स्मृतीतरंग (१९७४) उषा मगदूम यांचे 'अर्ध्या वाटेवर' (१९७४), आशालता सावे यांचे 'पानाआडचे फुल' (१९७५), गोदावरी परुळेकर यांचे 'जेव्हा माणूस जागा होतो' (१९७०) , आनंदीबाई शिर्के यांचे 'सांजवात' इत्यादी आत्मचरित्रातून स्त्रीला आलेले आत्मभान याची प्रचिती येते.

स्त्रियांच्या कथेचे स्वरूप अनुभवकेंद्री आहे. कथा हा प्रकार स्त्री जीवनाला अधिक जवळचा असल्याचे दिसते. मनोरंजनात्मक दृष्टीने लिहिणाऱ्या गिरिजा कीर, शकुंतला गोगटे, स्नेहलता दसनूरकर, योगिनी जोगळेकर इत्यादी स्त्रीवादी भूमिकेतून लेखन करणाऱ्या सानिया, उर्मिला पवार, प्रिया तेंडुलकर, मेघना पेठे, छाया दातार, गौरी देशपांडे इत्यादींचा समावेश करता येतो. चैत्रपालवी, सुखस्वप्न, मयूरपंख, मंगळसूत्र, कांचनबहार इत्यादी कथासंग्रहातील शिरीष पै यांच्या कथा म्हणजे स्त्रीच्या दुःखाचा शोध ! डोंगरची मैना, मुक्तांगण, कुळाचार, भिंगरी, देवदर्शन इत्यादी कथासंग्रहातील डॉ.सरोजिनी बाबर यांच्या कथा ग्रामीण परिसरातील स्त्रीच्या व्यथांचे चित्र रेखाटतात. १९६० नंतरच्या काळातील शिक्षणाच्या प्रभावाने आणि सर्वच प्रकारचे शिक्षण घेण्याची संधी त्यांना प्राप्त झाल्यावर त्यांचे कार्यक्षेत्र आणि वैचारिक प्रगल्भता वाढली त्यामुळे त्यांचे लेखनाचे विषयही बदलले.

**समारोप :-** प्रस्तुत लेखाच्या आधारे वारकरी संप्रदायातील संत कवयित्रीपासून ते अलीकडच्या काळातील काही ठळक स्त्री लेखकांनी लिहिलेल्या वेगवेगळ्या साहित्यप्रकारांचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. संत कवयित्रींनी आपल्या अभंगातून अध्यात्मिक जीवन आणि एक स्त्री म्हणून वाट्याला आलेले दुय्यम स्थान व्यक्त केले आहे. आजच्या काळातही स्त्री जीवन हे पूर्णतः स्वतंत्र दिसत नाही. स्त्री-मुक्ती चळवळीमुळेच स्त्रिया आज स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व, व्यक्तिमत्व घडवतांना दिसून येतात. सुरुवातीला कौटुंबिक विषय हाताळणाऱ्या स्त्री लेखिकांनी १९७५ नंतर स्त्रीवादाची भूमिका घेऊन पुरुषकेंद्री समाजव्यवस्थेला झुगारणारे साहित्य लेखन केल्याचे दिसते.

**संदर्भ सूची :-**

१) भामरे डॉ. सोनल, 'स्त्रीवादी साहित्याचा इतिहास', प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव.

२) खांडगे मंदा आणि इतर (संपा.), 'स्त्री साहित्याचा मागोवा खंड - २' साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, पुणे, २००२

३) भागवत विद्युत, 'स्त्री- प्रश्ना'ची वाटचाल: परिवर्तनाच्या दिशेने', प्रतिमा प्रकाशन, पुणे

४) धोंगडे डॉ. अश्विनी, 'स्त्रीवादी समीक्षा स्वरूप आणि उपयोजन', दिलीपराज प्रकाशन, प्रा.लि. पुणे

५) खोपडे डॉ.मधुवाला, 'स्त्रियांचे गद्यलेखन', स्नेहवर्धन पब्लिशिंग हाउस, पुणे